आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

३ ऑक्टोबर २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जीडीपी वाढीचा दर आठ टक्के इतका वाढवण्याची गरज असल्याचं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन

- सायबर गुन्हेगारीविषयक जनजागृती मोहिमेचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- सांगलीच्या अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदिर समितीचा विष्णुदास भावे गौरव पुरस्कार यंदा ज्येष्ठ अभिनेत्री नीना कुलकर्णी यांना जाहीर

**आणि**

- भारत-वेस्ट इंडिज कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताची आघाडी / के एल राहुलचं शतक

<><><><>

विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जीडीपी वृद्धीचा दर आठ टक्के इतका वाढवण्याची गरज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज अधोरेखित केली. नवी दिल्ली इथं कौटिल्य आर्थिक परिषदेच्या उद्घाटनाच्या सत्रात त्या बोलत होत्या. जागतिक अस्थिरतेच्या परिस्थितीतही देशांतर्गत घटकांमुळे भारताची स्थिती भक्कम असून कोणताही धक्का सहन करण्याची देशाची क्षमता असल्याचं सीतारामन यांनी सांगितलं.

***होल्ड... बाईट- निर्मला सीतारामन***

<><><><>

जीएसटी करप्रणालीतल्या सुधारणा २२ सप्टेंबरपासून लागू झाल्या असून त्याचा फायदा समाजाच्या सर्व घटकांना होत आहे. अप्रत्यक्ष करप्रणाली सुलभ करण्याच्या दृष्टीनं हे एक महत्त्वाचं पाऊल आहे. आज जाणून घेऊ या छोट्या कार आणि दुचाकींवरच्या कमी झालेल्या जीएसटीबद्दल...

***होल्ड... व्हीसी-***

*(जीएसटी प्रणालीत झालेल्या सुधारणांअंतर्गत छोट्या कारवरचा जीएसटी २८ टक्क्यांवरून १८ टक्के इतका झाला आहे. यामुळे मध्यमवर्गीय कुटुंबांवरचा आर्थिक तणाव कमी होऊन*

*छोटी शहरं आणि गावांमध्ये छोट्या कारच्या खरेदीला चालना मिळेल. याशिवाय, ३५० सीसीपर्यंतच्या दुचाकींवरचा २८ टक्के जीएसटी १८ टक्के झाल्यामुळेही मध्यमवर्गाला दिलासा मिळाला आहे. यामुळे ग्राहकांना तर फायदा होईलच, शिवाय उत्पादन आणि संबंधित क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या नव्या संधीही उपलब्ध होतील, अशी आशा आहे.)*

दरम्यान, नव्या जीएसटी प्रणालीमुळे वाहनांच्या किंमतीत घट झाल्यानं दसऱ्याच्या मुहूर्तावर यंदा मुंबईत १० हजार ५४१ वाहनांची विक्रमी नोंद झाली. गेल्या वर्षीच्या तुलनेत यात १४ टक्के वाढ झाली आहे. यंदा ग्राहकांचा कल इलेक्ट्रिक वाहनांकडे, विशेषतः विद्युत चारचाकींकडे असल्याची माहिती परिवहन विभागाने दिली.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमाला आज ११ वर्षं पूर्ण झाली. मन की बातचा पहिला भाग ३ ऑक्टोबर २०१४ रोजी विजयादशमीच्या निमित्ताने प्रसारित झाला होता. आतापर्यंत या कार्यक्रमाचे १२६ भाग पूर्ण झाले आहेत. हा कार्यक्रम सांस्कृतिक आणि सामाजिक परिवर्तनाचं प्रतीक असून तो सरकार आणि नागरिकांमध्ये थेट संवादाचं माध्यम बनला आहे.

**<><><><>**

अपघातात ज्याप्रमाणे वेळेवर उपचार मिळाले तर अपघातग्रस्तांचे प्राण वाचू शकतात त्याप्रमाणे सायबर फसवणुकीत तातडीने तक्रार दिल्यास फायदा होऊ शकतो, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत. ते आज मुंबईत सायबर जनजागृती महिन्याचं उद्घाटन केल्यानंतर माध्यमांशी बोलत होते. सध्या डिजिटल अटक, आर्थिक फसवणूक, सायबर बुलिंग अशा विविध सायबर गुन्ह्यांमुळे होणारी आर्थिक आणि मानसिक हानी रोखण्यासाठी हे गुन्हे घडूच नयेत यासाठी जनजागृती करणं गरजेचं आहे, असंही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**होल्ड.. बाईट - मुख्यमंत्री**

सायबर गुन्ह्यांविषयी जनजागृती करण्यासाठी शाळांमध्येही अशा प्रकारची व्यवस्था उभारणं गरजेचं असून विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतेनुसार अशा गुन्ह्यांविषयी जागृत करणं गरजेचं आहे. तसंच, एआयच्या माध्यमातून होणाऱ्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी एआयचीच मदत घ्यावी लागणार आहे, असंही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे लोकांच्या प्रश्नावर, विकासावर कधीच बोलू शकत नाहीत. काल झालेल्या दसरा मेळाव्यातही उद्धव ठाकरे यांनी हेच सिद्ध केल्याची टीका फडणवीस यांनी केली.

<><><><>

जमीन मालकीविषयक प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन या विषयावरच्या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेला  गुजरातमधे गांधीनगर इथं आज सुरुवात झाली. गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी उद्घाटन सत्रात बोलताना नागरिक जमिनीच्या नोंदींचं डिजिटायझेशन आणि स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर करण्याचं  महत्व अधोरेखित केलं.

या परिषदेत आज नवीन महसूल कार्यलयांचं, महसूल डायरीचं  आणि एकात्मिक जमीन प्रशासन प्रणालीचं उद्घाटनही झालं. तसंच स्वामित्व कार्डांचं वाटपही करण्यात आलं.

<><><><>

सांगलीच्या अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदीर समितीचा विष्णूदास भावे पुरस्कार ख्यातनाम अभिनेत्री नीना कुलकर्णी यांना जाहीर झाला आहे. २५ हजार रुपये रोख, स्मृतीचिन्ह, शाल आणि श्रीफळ असं या पुरस्काराचं स्वरुप आहे, अशी माहिती समितीचे अध्यक्ष डॉ. शरद कराळे यांनी आज वार्ताहर परिषदेत दिली.

<><><><>

भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन येत्या डिसेंबरमधे भारत दौऱ्यावर येणार आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी त्यांच्याशी चर्चा करतील. रशियन सरकारचे प्रवक्ते दिमित्री पेस्केव यांनी काल या वृत्ताला दुजोरा दिला. युक्रेन संघर्ष सुरू झाल्यानंरचा पुतीन यांचा हा पहिलाच भारत दौरा असेल.

<><><><>

सामाजिक सुरक्षा क्षेत्रातल्या उत्कृष्ट कामगिरीसाठी दिला जाणारा इस्सा अर्थात आंतरराष्ट्रीय सामाजिक सुरक्षा संघटना पुरस्कार यंदा भारताला प्रदान करण्यात आला. मलेशियात क्वालालंपूर इथं केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी हा पुरस्कार स्वीकारला. हा पुरस्कार प्रत्येक भारतीयाच्या सामाजिक कल्याणासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचं प्रतीक आहे, असं मांडवीय यांनी यावेळी सांगितलं.

देशातल्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांमुळे समाजातल्या शेवटच्या घटकापर्यंत सामाजिक सुरक्षेचा लाभ पोहोचला, असंही ते म्हणाले.

<><><>

लदाखच्या लेह जिल्ह्यात जनजीवन पूर्वपदावर येत आहे. काही दिवसांपूर्वी हिंसक आंदोलनानंतर तिथं तणाव निर्माण झाला होता. आता प्रशासनानं सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळात संचारबंदी शिथिल केली आहे. मात्र मोबाईल डेटा सेवा अद्याप बंद आहे. शाळा सुरू झाल्या असून बस आणि टॅक्सी वाहतूकही सुरू झाली आहे.

दरम्यान, लदाखचे पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत ताब्यात घेतल्याच्या विरोधात त्यांच्या पत्नी गीतांजली अंगमो यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. सध्या सर्वोच्च न्यायालयाला दसऱ्याची सुट्टी असल्यानं यावर सुनावणी कधी होणार, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. वांगचुक यांना २६ सप्टेंबर रोजी लडाखमधून अटक झाली होती आणि सध्या ते जोधपूरच्या कारागृहात आहेत.

<><><>

नॉर्वे इथं सुरु असलेल्या जागतिक भारोत्तोलन अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या मीराबाई चानूनं रौप्य पदक पटकावलं. ४८ किलो वजनी गटात मीराबाईने स्नॅच मध्ये ८४ किलो तर क्लीन अँड जर्क मध्ये ११५ असं एकंदर १९९ किलो वजन उचलत ही कामगिरी केली.

<><><>

१२व्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत काल भारताने आणखी दोन पदकांची कमाई केली. त्यामुळे चार सुवर्ण, पाच रौप्य आणि दोन कांस्य पदकांसह पदक तालिकेत भारत सातव्या स्थानावर पोहोचला आहे.

<><><>

आसामी गायक झुबीन गर्ग याचा शवविच्छेदन अहवाल सिंगापूर पोलीस दलानं सिंगापूरच्या भारतीय उच्चायुक्तालयाकडे सुपूर्द केला. या प्रकरणाचा तपास सध्या सुरू आहे. आसाम पोलिसांच्या गुन्हे तपास विभागानं झुबीन गर्ग यांचे सहकारी शेखर ज्योती गोस्वामी आणि अमृतप्रवा महंत यांना आज अटक केली. सिंगापूर इथं झालेल्या ईशान्य भारत महोत्सवाचे मुख्य आयोजक श्यामकानू महंत आणि झुबीन गर्ग यांचे व्यवस्थापक

सिद्धार्थ शर्मा यांना पोलिसांनी बुधवारी अटक केली होती. हे दोघे सध्या पोलीस कोठडीत आहेत.

**<><><>**

जगविख्यात प्रायमेट्स आणि मानववंश वैज्ञानिक जेन गुडॉल यांचं काल अमेरिकेत निधन झालं. त्या ९१ वर्षांच्या होत्या. निसर्ग जतनासाठी आयुष्याची साठ वर्षं अथकपणे कार्य करणाऱ्या जेन गुडॉल यांनी, चिंपांझी आणि त्याप्रकारच्या प्राण्यांच्या अभ्यासात क्रांती घडवली. त्यांच्या कार्यामुळे प्राण्यांच्या अधिकारावर नव्यानं विचार होऊ लागला. वन्य प्राण्यांची वसतीस्थानं नष्ट होत असल्याबाबत त्यांनी जगाला हवामान बदलावर तातडीनं कृती करण्याचं आवाहन केलं होतं.

**<><><>**

भारत-वेस्ट इंडिज कसोटी क्रिकेट मालिकेत पहिल्या सामन्याच्या आजच्या दुसऱ्या दिवशी भारताने १७८ धावांची आघाडी घेतली आहे. अहमदाबादमधे सुरु असलेल्या या सामन्याच्या कालच्या पहिल्या दिवशी वेस्ट इंडिजने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली. मात्र, भारताने वेस्ट इंडीजचा पहिला डाव १६२ धावात गुंडाळला. दिवस अखेर भारताच्या २ बाद १२१ धावा झाल्या होत्या. के. एल. राहुलनं दमदार फलंदाजी करत शतक पूर्ण केलं. मात्र, जस्टीन ग्रीव्हज्च्या चेंडूवर तो झेलबाद झाला. शुभमन गिल देखील अर्धशतक करून बाद झाला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ४ बाद ३४० धावा झाल्या होत्या.

**//<><><><>//**